## नियमीत दिवाणी मुकदमा नं. १९१/२०१४ मधील नि.५२ वरील आदेश

सदरील अर्ज प्रतिवादीने विना कैफियत व म्हणणे एकतर्फा चौकशीचा आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीचे कथन की, वादीने प्रतिवादी विरुध्द निरंतर ताकीद मिळणेसाठी दावा दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी वेळेत कैफियत न दिल्यामुळे त्याचे विरुध्द विना कैफियत व म्हणणे एकतर्फा चौकशीचा आदेश झाल आहे. प्रतिवादी हे मजुरीचे कामासाठी परगावी गेल्यामुळे त्यांना वेळैत कैफियत देता आली नाही. प्रतिवादी आजरोजी कैफियत व म्हणणे देत आहेत. तरी प्रतिवादी विरुध्द विना कैफियत व म्हणणे एकतर्फा चौकशीचा आदेश रद्द करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. वादी यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दिले आहे. वादीचे म्हणणे की, सदर अर्ज व त्यातील कारण खोटे आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा. प्रतिवादी यांना दि.०१.०१.२०१५ रोजी प्रस्तुत दाव्याची नोटीस मिळाली असून प्रतिवादी हे दि.०४.०४.२०१६ रोजी हजर झाले आहेत. प्रतिवादी यास योग्य संधी दिल्यानंतर कैफियत नाहीचा आदेश झाला आहे. वादीचा पुरावा दि.३०.१.२०१८ रोजी बंद केला आहे. तसेच वादी व वादीचे साक्षीदार यांच्या जबाबाच्या प्रती प्रतिवादीचे वकीलांनी घेतलेल्या आहेत. त्यामुळे केवळ वादीस त्रास दयावा व दावा लांबणीवर टाकणेसाठी प्रस्तुत अर्ज दिलेला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जाचे व दाव्यातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा वाटपासाठी व पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१३ यास दाव्याचे समन्स मिळूनही तो हजर झाला नाही. त्यामुळे त्याचे विरुध्द दि.२०.०७.२०१५ रोजी एकतर्फा चौकशीचे आदेश पारित करण्यात आले आहेत. परंतु प्रतिवादी क्र.१३ हा वकीलांमार्फत दि.०४.०४.२०१६ रोजी हजर झाला आहे. परंतु त्याने एकतर्फा चौकशीचे आदेश रद्द होवून कैफियत देण्याची परवानगीसाठी कोणताही अर्ज दिलेला नव्हता. सदर प्रतिवादी यांनी कैफियत देण्यास झालेला विलंब माफ होवून मिळण्यासाठी दि.०९.०७.२०१९ रोजी अर्ज दिलेला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीचा पुरावा पूर्ण झालेला असून प्रतिवादी यांना संधी देवूनही पुरावा दिला नाही. त्यामुळे दावा प्रतिवादी यांच्या पुराव्याविना पुढे चालविण्याचे आदेश दि.२४.०७.२०१९ रोजी पारित करण्यात आले आहेत. प्रतिवादी क्र.१३ यास दाव्याची संपूर्ण कल्पना असतानाही त्याने अंतिम स्टेजला प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

५. प्रस्तुतचा दावा वाटपासाठी व पृथक कब्जा मिळणेसाठी असून स्थावर मिळकतीबाबतचा असल्यामुळे प्रतिवादीचे मौल्यवान हक्क व हितसंबंध दावा मिळकतीमध्ये गुंतलेले आहेत. दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी प्रतिवादी यास आपली बाजू मांडण्याची संधी देणे जरुरीचे आहे. प्रतिवादी याचा अर्ज नामंजूर केल्यास दाव्याची श्रृंखला वाढत जाणार आहे. नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादीस आपली बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे.

प्रतिवादी याचा नि.५०वरील विलंब माफीचा अर्ज योग्य ते खर्चाचे आदेश पारित करुन मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे वरील सर्व विश्लेषणावरुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरेल. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने नि.५० वरील आदेशाप्रमाणे खर्चाची रक्कम वादीला अदा केल्यास त्याचे विरुध्द झालेला विना कैफियत व एकतर्फा चौकशीचा आदेश रद्द करणेत येतो.

( **ए.एच.शेख** )

दि.२५.११.२०१९. प्र.तिसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला.

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment

a)Name of the Stenographer :A.A.Chavan.

b) Court : 2nd Jt. Civil Court, Sangola

c) Judgment/Order signed by PO on : 25.11.2019

d) Judgment/Order uploaded on : 01.01.2020.